दि. ०२/१२/२०१७

# प्रेस नोट

परकिय नागरिक नोंदणी विभाग, विशेष शाखा -०२, पुणे शहर या कार्यालयात पाकिस्तान नागरिकांचे लाँग टर्म व्हिसाशी संबंधित येणा-या अडचणींचे निवारण व कायदेशीर बाबी पडताळणी कामी दि. ३०/११/२०१७ रोजी परकिय नागरिक नोंदणी कार्यालय गृहमंत्रालय भारत सरकार येथील परकिय नागरिक विभागामार्फत लाँग टर्म व्हिसासाठी आवेदन केलेल्या नागरिकांचे समस्या सोडविण्याकरीता विशेष कॅम्पचे आयोजन करण्यात आले होते.

सदर कॅम्पकरीता एम.एच.ए.,न्यु दिल्ली मधील परकिय नागरिक विभागाचे अवर सचिव श्री. प्रमोद कुमार आणि त्यांचे सहकारी श्री. पकंज शर्मा व श्री. राकेश सिन्हा यांनी एफ.आर.ओ. मधील अधिकारी यांचे सोबत सविस्तर चर्चा सत्र झाले व त्यानंतर संस्कार हॉल,वाहतुक विभाग येथे निमंत्रित पाक नागरिक यांचे लाँग टर्म व्हिसा संदर्भात अडचणी जाणून घेवून त्वरित निवारण करण्यात आले. सदर कॅम्पकरीता एकूण २४ पाकिस्तान नागरिक उपस्थित होते.

सदरचा कॅम्प हा मा.पोलीस आयुक्त श्रीमती रश्मी शुक्ला व मा. पोलीस सह आयुक्त यांचे मार्गदर्शनाखाली व मा.पोलीस उप-आयुक्त ज्योती प्रिया सिंह यांचे प्रमुख उपस्थितीत तसेच परकिय नागरिक नोंदणी शाखेतील स.पो.आ. सतिश पाटिल, पो.नि. अनुजा देशमाने, पो.नि. निंबाळकर, पो.नि. भापकर, स.पो.नि. करे व इत्तर अधिकारी आणि एन.आय.सी.चे श्री. प्रसन्ना यांचे उपस्थितीत पार पडला .